नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/06/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावरील वडंली वाघ शिवार दिनांक 20/06/2021 चे 21:00 वा. ते 21.10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– केशवराव मोतीराम धुर्वे वय 51 वर्ष रा. खडकी व आरोपी नामे– शेषराव मोतीराम धुर्वे वय 54 वर्ष रा. खडकी हे सख्खे भाउ असुन नेहमी कोणत्या न कोणत्या कारणावरून वादविवाद करीत असतात. फिर्यादी हे घरी हजर असता आरोपी हा घरासमोर आला व म्हणाला की, ''तुने माइया टाकीतील पाणी का घेतले'' म्हणुन शिवीगाळ करू लागला. तेव्हा फिर्यादीने त्याला हटकले व म्हटले की, ''तुझ्या टाक्यातील एक मंगा पाणी घेतले ते मी परत देईन'' असे म्हटले असता आरोपी याने काही न ऐकता फिर्यादीच्या डोक्यावर व उजवे पायावर काडीने मारले त्यामुळे पायाला मुका मार लागला व डोक्यातुन रक्त निघाले आहे. त्याने पुन्हा मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही :– दिनांक 22/06/2021 चे 14.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गुरूकर 9665834999 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर